P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक - २४/०९/२०२३**

**दि.२३/०९/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ७५५/२०२३ भा द वि का क ३९५,३६४(अ) ३८७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२१/०९/२०२३ रोजी ०९.१५ वा ते दि.२३/०९/२०२३ रोजी १७.४५ वा पर्यंत चे सुमा. नाशिक रोडवर भंडारा हॉटेलसमोर शिरोली येथुन मोठया पुलावरुन खेडे गावात. आरोग्यम हॉस्पीटलचे मागे

गुन्हा दाखल :- दि.२३/०९/२०२३ रोजी २३.५६ वा

फिर्यादी :- संजय धुलाप्पा कुरुंदवाडे वय ५५ वर्षे, शिक्षण - बीएसी,व्यवसाय - उद्योजक, रा. मीना रेसीडन्सी, फलॅट नं. ए-३, २०२, एकतानगर, नाशिक रोड, चाकण पुणे. मु.रा. मु.पो. लिंगायत गल्ली कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली,

आरोपी :- १) आकाश विनायक भुरे वय २२ वर्षे, रा. नाणेकरवाडी, ता. खेड, जि. पुणे. २) शुभम सरोदे ३)अजय येलोटे ४) सोहेल पठाण ५) पन्या गोसावी पुर्ण नावे माहीती नाही,तसेच एक अनोळखी इसम
**आरोपी नं. १ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांची पॅशन मोटार सायकलनं. एम.एच. १० सी ३९८५ ही वरुन आळंदी फाटा येथुन एकतानगर चाकण येथे घरी जात असताना पाठी मागुन रिक्षा मधुन आरोपी क्र १ ते ५ व एक अनोळखी इसम यांनी फिर्यादी यांचे मोटार सायकल समोर रिक्षा आणुन अडवुन रस्त्याचे कडेला घेवुन तु रिक्षास धडक मारली आहे, नुकसान भरुन दे असे म्हणुन फिर्यादी यांचा मोबाईल फोन व मोटार सायकलची चावी घेवुन त्यांना बळजबरीने रिक्षात बसवुन शिरोली येथे एका शेतात अंधारात नेउन रात्रौ ११.३० ते १२.३० वा पर्यत फिर्यादी यांना शेतात डांबुन ठेवुन तुझा व्यवसाय मोठा आहे, तुला आम्हाला एक कोटी रुपये द्यावे लागतील तरच तुला सोडु नाही तर तुझी व तुझे घरच्यांची सगळयांची गेम करु उडवुन टाकु अशी धमकी देवुन हत्यार फियादी यांचे उजवे पायाचे गुडघ्यावर ठेवुन धमकी त्यांनी फिर्यादी यांचे सॅग उघडुन त्यातील २०,०००/- जबरीने काढुन घेतले व त्यांना म्हणाले की दोन दिवसात कमीत कमी १२ लाख रुपये दिले नाही तर तुला व तुझे घरच्यांना संपवुन टाकु अशी धमकी देवुन नंतर सारा सिटी येथे मोटार सायकलवरुन आणुन सोडुन दिले. त्यानंतर दि. २३/०९/२०२३ रोजी सायंकाळी ०५.४५ वा पर्यत वेगवेगळया नंबर वरुन फिर्यादी यांना फोन करुन ०७ लाख रुपयांची मागणी करुन पैसे दिले नाहीतर फिर्यादी व त्यांचे घरच्यांना जिवे मारण्याची धमकी दिली आहे, म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गायकवाड ९६८९३२३१२३

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- दिघी ४४३/२०२३ भा. द. वि कलम ३९२

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २१/९/२०२३ रोजी रोजी अंदाजे ११:४५ वा.चे दिघी गावाकडे ओढया जवळील जाणा-या रोडच्या बाजुला निर्जन स्थळी

गुन्हा दाखल :- दि २३/०९/२०२३ रोजी ०२/२६वा

फिर्यादी :- अशोक पुनवासी जैसवाल वय ३० वर्षे, व्यवसाय गिरण, सध्या रा.सावंतामाळी मंदिर जवळ चद्रकांत निकम यांचे खोलीत च-होलीगाव ता.हवेली जि.पुणे

आरोपी :- अनोळखी इसम
**निष्पन्न आरोपी-**
अक्षय देवदत्त फाळके वय २४ वर्षे रा मौजे शाळेच्या पाठिमागे माऊली नगर दिघी पुणे

**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी शास्त्री चौक ते च-होली गाव येथे जुपीटर गाडीवरुन जात असताना गव्हाणे पेट्येलपंपाजवळ अनोळखी इसमाने फिर्यादीकडे लिफ्ट मागीतल्याने दिघी गावाकडे ओढयाजवळील जाणा-या रोडच्या बाजुला निर्जन स्थळी अनोळखी इसमाने लघुशंका करीता थांबण्यास सांगुन त्याचेकडील चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे खिशातील ३,०००/-रु किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल व १८,०००/- रुपये रोख रक्कम तसेच ग्रे रंगाची १५,०००/-रु किंमतीची जुपीटर गाडी क्र.एम.एच.१४/एच.ए.९१८१ असा एकुण ३६,०००/- रु.किंमतीचा माल जबरीने काढुन घेऊन अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेला.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा शिंदे, ९८२२२०९५६१

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ४६२/२०२३ भा.द.वि. कलम ३९४,३२३,५०४,५०६,३४ भा.हत्यार कायदा कलम ४/२५, ४/२७, महाराष्ट्र पो. अधि कमल ३७(१) (३) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २२/०९/२०२३ रोजी १६/०० वा. चे सुमारास पावर हाऊसकॉर्नर,रेल्वे पटरी जवळ चिंचवड पुणे.

गुन्हा दाखल :- दि २३/०९/२०२३ रोजी ०० /४९ वा.

फिर्यादी :- संतोष ओमप्रकाश कस्तुरिया वय ४० वर्षे धंदा नोकरी रा. साई संतोष हाऊ.सोसा. ०७ वा मजला फ्लॅट नंबर ७१२ मिलींदनगर पिंपरी पुणे १७

आरोपी :- १)सुमीत शाम कांबळे वय १९ वर्षे रा. आनंद नगर कुपर कोपरा चिंचवड पुणे व
२) रोहित भाऊ पुर्ण नाव पत्ता माहित नाही तसेच त्यांचे इतर
३)विनोद ऊर्फ इंटर सुनिल ओव्हाळ वय २७ वर्षे रा कुपर कोपरा आनंदनगर झोपडपटटी चिंचवड पुणे व
४)दोन साथीदार

**आरोपी क्र १ व ३ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे सुदर्शननगर चिंचवड येथे राममंदीर येथे आले असता यातील आरोपी क्र. ०१ याने फिर्यादी यांना लिफ्ट मागुन त्यांना घटनास्थळी नेवुन आरोपी क्र २ व ३ यांचे मदतीने फिर्यादी यांचे ४०,०००/- रु किंमतीची ७ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन व ६,०००/-रु किंमतीची १ ग्रॅम वजनाची कानातील बाळी, तसेच फोन पे ॲप चे माध्यमातुन जबरदस्तीने काढुन घेतलेली ३,९००/-रु रक्कम. अशी एकुण ४९,९००/- रु किंमतीचा माल फिर्यादी यांना लोखंडी कोयत्याचा धाक दाखवुन उलटया कोयत्याने व लाथा बुक्यांनी मारहाण करुन जबरदस्तीने काढुन घेतला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि रणवरे,९५५२५५०३१४

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ९३९ /२०२३, भा.दं.वि. कलम ३५४(ड) (१) माहीती तंत्रज्ञान कलम ६६(क)६७ (अ)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २३/०९/२०२३ रोजी १४/३० वा वा चे सुमा.रूम नं ०४आकाश बारणे चाळ मधुबन कॉलनी थेरगाव पुणे

गुन्हा दाखल :- दि. २३/०९/२०२३ रोजी २३/५४ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- Gairiirnsiing या इंस्टाग्राम खात्याचा वापरकर्ता संशयीत आरोपी प्रमोद पंजाबराव गुंड पाटील

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी या त्यांचे घरी असताना Gairiirnsiing या इंस्टाग्राम खात्याचा वापरकर्ता याने फिर्यादी हिची मुलगी हिचा साधारण ओळख असलेला फोटो सदर खात्याचे प्रोफाईलला ठेवला तसेच फिर्यादी हिची अनन्य साधारम ओळख असलेला अश्लील फोटो बनवून तो फिर्यादी हिचे परवानगी शिवाय Gairiirnsiing इंस्टाग्राम खात्यावर पोस्ट करून सोशल मिडीया इंटरनेटच्या माध्यमातून प्रसारीत करून फिर्यादी हिचे स्त्री मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि (गुन्हे) घाडगे ७०२११२९२९१

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- आळंदी २५८/२०२३ महा.प्रो. ॲक्ट कलम ६५ (सी)(एफ) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २३/०९/२०२३ रोजी १६/२० वा चे सुमा.महादेव मंदीरा जवळ मोकळया जागेत मौजे सोळु ता. खेड जि. पुणे गावचे हद्दीमध्ये

गुन्हा दाखल :- दि. २३/०९/२०२३ रोजी २२/५४ वा.

फिर्यादी :- अमर शांताराम कदम, वय - ३५ वर्षे, पोलीस शिपाई .ब. नं. २८६५, नेमणुक - दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय मो. नं. ८०१०८७८८२६

आरोपी :- जयराम यादव, वय - २९ वर्षे, रा लक्ष्मण सस्ते यांचे चुलत्याच्या रुममध्ये भाडयाने, मोशी, पुणे मुळ रा ग्राम बिल्लाह तहसील सुराव जि प्रयागराज राज्य उत्तरप्रदेश
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हा एका पत्र्याचे पिंपामध्ये तसेच जमिनीलगत खड्डा करुन त्यामध्ये प्लॅस्टीकची ताडपत्री टाकुन त्यामध्ये गावठी हातभट्टीची दारु निर्मीतीकरीता लागणारे असे एकुण मिळुन ११,००० हजार लीटर रसायन व साहित्य जवळ बाळगले स्थितीत दिसून आला तसेच एकुण ६ हत्तीकॅण्ड मध्ये तयार हातभट्टी दारु एकुण २१० लीटर असे एकुण ११,४२,०००/- रु किं चा माल बाळगले स्थितीत मिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ गाडेकर ९९२३२९३०४२

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव एमआयडीसी २४५/२०२३ भादवि कलम ३७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/०९/२०२३ रोजी २१/०० वा ते दि.२१/०९/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा.चेदरम्यान मौजे कातवी ता.मावळ जि.पुणे येथील के.बी.डी डेव्हलपर्स या बांधकाम साईट वर

गुन्हा दाखल :- दि.२३/०९/२०२३ रोजी १९/०७ वा

फिर्यादी :- मोहन वसंत मालवाडकर वय-५१ वर्षे व्यवसाय-बांधकाम रा प्लॉट नं.२२ पामगुरु सोसायटी, बी.टी. कवडे रोड,घोरपडी पुणे

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मालकिचे अंदाजे ४७८० किलो एकुण किंमत १,४३,४००/-रु किमतीचे लोखंडी सेट्रींग मटेरियल चा माल हा कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि आहिरे ९६८९९४६७८४

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- म्हाळुंगे एमआयडीसी ५७६/२०२३ भा.द.वी. कलम २७९,३३७, ३३८, मो. वा.का. १८४, १३४ (अ)(ब)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२२/०९/२०२३ रोजी १९/३० वा सुमा.मौजे—कुरुळी गावचे हद्दीतील सोनवणेवस्ती फाट्याजवळ नाशिक पुणे हायवे रोडवर

गुन्हा दाखल :- दि.२३/०९/२०२३ रोजी१८ / ५८ वा.

फिर्यादी :- गोपीराज चंपतराव पवार वय ३१ वर्ष व्यवसाय शेती रा. पारडी वैजापुर पो.निवघाता.मुदखेड जि.नांदेड

आरोपी :- अज्ञात वाहनावरील अज्ञात चालक

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी नाशिक पुणे हायवेवर पुणे जाणारे लेनवर सोनवणेवस्ती फाट्याजवळ कोणत्यातरी अज्ञात वाहनाने अभिजीत मुरताजी काळेवाड वय २३ वर्ष रा आळंदी फाटा गवतेवस्ती चाकण ता.खेड पुणे मुळ रा. राहेर ता.नायगाव जि.नादेड यास तो पायी रस्ता क्रॉस करीत असताना धडक देवुन अपघात करून अभिजीत याचे डोक्यास गंभीर दुखापत होण्यास कारणीभुत झाला आहे तसेच सदर अज्ञात वाहनावरील चालकाने अपघाता बाबतची माहीती पोलीसांना न देता व अभीजीत याला उपचारकामी हॉस्पीटल येथे घेवुन न जाता त्याचे वाहन घेवुन पळुन गेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि भंडरवाड ९५४५६००९९९